बुधवार, १५ सप्टेंबर २०२१

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक ५९
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## राज्य सरकारची सावकारासारखी वसुली –फडणवीस



**मुंबई :** एकीकडे कोरोनामुळे शेतकरी असो की सामान्य नागरिक तो अडचणीत आहे आणि तो अडचणीत असताना त्यांना मदत करण्याच्या ऐवजी, त्याच्याकडून जबरदस्ती वसुली या सरकारला करायची आहे. सावकारासारखी वसुली करायची आहे. म्हणून हे सगळे नाटक सुरू आहे, अशी टीका महाविकास आघाडी सरकारवर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. १४) माध्यमांशी बोलताना केली. वीजबिल थकबाकीची वेळेवर वसुली झाली नाही, तर राज्य अंधारात जाऊ शकते, असे राज्याचे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी म्हटले आहे, या पार्श्वभूमीवर फडणवीसांनी निशाणा साधला आहे, तसेच ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी जे सांगितले, त्यातूनच हे लक्षात येते की त्यांच्या काळात किती थकबाकी वाढली. जबरदस्ती वसुली करण्यासाठी हा सगळा बाऊ तयार करण्यात येतोय, असेही फडणवीस म्हटले.

### अंतरंग

‘...तर मविआ सरकारला सळो की पळो करू’/२

नवी मुंबईत फेरीवाल्यांमुळे वाहतूक कोंडी/३

रायगडातील एसटी कर्मचारी आर्थिक विवंचनेत/५

## ओबीसी आरक्षणावरून भाजपची आक्रमक भूमिका

# आघाडी सरकारविरोधात आज आंदोलन

### सर्वोच्च न्यायालयात वकील का दिला नाही? खुलासा करण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ओबीसी समाजाचा विश्वासघात करून ओबीसी आरक्षण घालविणाऱ्या आघाडी सरकारविरोधात भारतीय जनता पक्षातर्फे बुधवारी (दि. १५) राज्यभर आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात उत्तर रायगड जिल्हाही सहभागी होणार आहे, अशी घोषणा भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष प्रशांत ठाकूर यांनी केली. आघाडी सरकारने सर्वोच्च न्यायालयात ओबीसी आरक्षणाची बाजू मांडण्यासाठी वकीलच दिला नाही, या काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या आरोपावर मुख्यमंत्री ठाकरे व ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी उत्तर द्यावे, अशी मागणीही आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली.



त्यांनी सांगितले की, गेले सहा महिने आघाडी सरकार ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणाबाबत टोलवाटोलवी करत आहे. ओबीसी समाजाचा इम्पिरीकल डेटा गोळा करण्यासाठी तातडीने कार्यवाही सुरू करा, असे भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाने राज्य सरकारला सातत्याने सांगितले आहे, मात्र आघाडी सरकारने गेल्या सहा महिन्यांत काही हालचालीच केल्या नाहीत. इम्पिरीकल डेटा गोळा करण्यासाठी नेमलेल्या मागासवर्गीय आयोगाला आघाडी सरकारने निधीही दिला नाही. या हलगर्जीचा परिणाम ओबीसी आरक्षणाशिवाय पाच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत.

सत्ताधारी पक्षातील वजनदार गटाला पुढील वर्षी होणाऱ्या महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद निवडणुका ओबीसी समाजाला आरक्षण न देताच घ्यावयाच्या असल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात ओबीसी आरक्षणाची बाजू प्रभावीपणे मांडली नाही. राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात वकीलच उभा केला नाही असे सत्ताधारी पक्षाचा प्रदेशाध्यक्ष म्हणतो आहे. विधी व न्याय खात्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या मुख्यमंत्री ठाकरे यांनी व आघाडी सरकारचे पालक म्हणविणाऱ्या शरद पवार यांनी नाना पटोले यांच्या आरोपावर खुलासा करावा, असेही त्यांनी सांगितले.

ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका होणार नाहीत, असे वारंवार सांगणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी आरक्षण टिकविण्यासाठी काहीच हालचाल केली नाही. ओबीसी समाजाच्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्या आघाडी सरकारविरोधात भारतीय जनता पक्षातर्फे १५ सप्टेंबर रोजी आंदोलन केले जाईल, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद केले.

#### राज्यभर होणार निदर्शने

ओबीसी समाजाचा विश्वासघात करून ओबीसी आरक्षण घालविणाऱ्या आघाडी सरकारच्या विरोधात भारतीय जनता पक्षातर्फे पुन्हा राज्यभर आंदोलन करण्यात येणार आहे. भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष आमदार संजय कुटे आणि भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष योगेश टिळेकर यांनी याबाबत मंगळवारी घोषणा केली. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत कुटे व टिळेकर बोलत होते. प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये या वेळी उपस्थित होते.

## अमरावतीमध्ये नदीत बोट उलटून ११ जण बुडाले



### तीन जणांचे मृतदेह सापडले

**अमरावती : प्रतिनिधी**

अमरावती जिल्ह्यातील वरूड तालुक्यातील श्री क्षेत्र झुंज येथे वर्धा नदीच्या पात्रात बोट उलटून ११ जण बुडाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि. १४) सकाळी घडली. आतापर्यंत नावाड्यासह तिघांचे मृतदेह सापडले असून इतर लोकांचा शोध घेऊन उशिरापर्यंत बचावकार्य सुरू होते.

गाडेगाव येथील मटरे कुटुंबातील दशक्रिया विधीला त्यांचे नातेवाईक सोमवारी तेथे पोहचले होते. दशक्रिया विधी आटोपल्यानंतर मंगळवारी सकाळी सर्व जण श्री क्षेत्र झुंज येथे पोहचले. या ठिकाणी नदीपात्रातच कमी उंचीचा धबधबा असून पर्यटक गर्दी करतात. सकाळच्या सुमारास एका बोटीतून महादेव मंदिराकडे जात असताना पर्यटकांची बोट नदीपात्रात उलटली. त्यात कुटुंबातील ११ जण बुडाले. यामध्ये बहीण, भाऊ, जावई यांचा समावेश आहे.

या दुर्घटनेत सर्वांना जलसमाधी मिळाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. घटनास्थळी मदत व बचाव पथकाला पाचारण करण्यात आले आहे. नदीत बुडालेल्या व्यक्तींचा शोध सुरू आहे.

## मुख्यमंत्र्यांचा ताफा अडवण्याचा मराठा ठोक मोर्चातर्फे इशारा

### प्रलंबित मागण्यांसाठी पवित्रा

**औरंगाबाद : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्या १५ दिवसांत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनाला तीन महिने उलटूनही निर्णय घेतला नाही. त्यामुळे हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनी मुख्यमंत्र्यांना काळे झेंडे दाखवून त्यांचा ताफा अडवणार आहोत, असा इशारा मराठा क्रांती ठोक मोर्चाचे समन्वयक रमेश केरे यांनी पत्रकार परिषदेत दिला.

मराठा विद्यार्थ्यांसाठी जिल्हानिहाय स्वतंत्र वसतिगृह बांधावे, ‘सारथी’ संस्थेचे उपकेंद्र द्यावे आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची १० लाख रुपये कर्ज प्रस्तावाची मर्यादा २५ लाखांपर्यंत वाढवण्याची मागणी मराठा क्रांती ठोक मोर्चाने केली होती. या पार्श्वभूमीवर संघटनेचे समन्वयक आणि मुख्यमंत्री यांच्यात बैठक झाली होती. हे प्रश्न १५ दिवसांत सोडवण्याचे आश्वासन देऊनही मागण्या प्रलंबित असल्याबाबत संघटनेने नाराजी व्यक्त केली आहे. येत्या १७ सप्टेंबरला मुख्यमंत्री ठाकरे हैदराबाद मुक्तीसंग्राम दिनाच्या कार्यक्रमाला औरंगाबादमध्ये येणार आहेत. या वेळी मुख्यमंत्र्यांचा ताफा अडवून काळे झेंडे दाखवणार आहोत, असे केरे यांनी सांगितले तसेच येत्या ७ ऑक्टोबर रोजी राजकीय पक्षप्रमुखांच्या निवासस्थानासमोर शासनाच्या ‘जीआर’ची होळी करणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात मोर्चे काढण्याचे नियोजन सुरू आहे, अशी माहिती केरे यांनी दिली.

पत्रकार परिषदेला समन्वयक अप्पासाहेब कुढेकर, राहुल पाटील, किरण काळे, भरत कदम, निवृत्ती मांडकीकर, मनोज मुरदारे आदी उपस्थित होते.

## पाकपुरस्कृत सहा दहशतवाद्यांना अटक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने पाकिस्तान संघटित दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. स्पेशल सेलने सहा जणांना अटक केली असून यापैकी दोन पाकिस्तान प्रशिक्षित दहशतवादी देखील आहेत. स्पेशल सेलचे डीसीपी प्रमोद कुशवाह यांनी याबाबत माहिती दिली. स्पेशल सेलने केलेल्या कारवाईत स्फोटके आणि शस्त्रास्त्र जप्त केली आहेत. अटकेची ही कारवाई दिल्ली, उत्तर प्रदेश, महाराष्ट्रात करण्यात आली आहे. दिल्ली पोलिसांचे एक महिन्यापासून हे ऑपरेशन सुरू होते.

### निवडक

#### शेतकरी आंदोलनावरून चार राज्यांना नोटीस

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने दिल्ली, राजस्थान, हरियाणा, उत्तर प्रदेश या राज्यांना नोटीस पाठवली आहे. येथे सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनामुळे नऊ हजारांहून अधिक उद्योग बंद पडल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. वाहतूक व्यवस्था कोलमडल्याने बऱ्याच समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे आयोगाने म्हटले आहे.

#### पुलवामात दहशतवाद्यांचा ग्रेनेड हल्ला; चौघे जखमी

**श्रीनगर :** पुलवामात दहशतवाद्यांनी हँड ग्रेनेड फेकून हल्ला केला. यात चौघे जखमी झाले. जम्मू-काश्मीरमधील सुरक्षा दलांनी ही माहिती दिली. ग्रेनेड रस्त्याच्या बाजूला जाऊन फुटला. मंगळवारी ही घटना घडली.

## अनिल देशमुखांची याचिका ऐकण्यास हायकोर्टाचा नकार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना तातडीचा कोणताही दिलासा न देता हायकोर्टाने त्यांची याचिका ऐकण्यास नकार दिला आहे. न्यायमूर्ती संदीप शिंदे यांनी देशमुखांना त्यांची याचिका सुनावणीसाठी खंडपीठाकडे वर्ग करण्याचे निर्देश दिले आहेत.

या याचिकेवर हायकोर्ट रजिस्ट्रीने घेतलेला आक्षेप आणि ईडीने उठवलेला सवाल हा योग्यच असल्याचे न्यायमूर्ती शिंदे यांनी मंगळवारी आपल्या निकालात स्पष्ट केले. त्यामुळे अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) बजावलेल्या समन्सविरोधात मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतलेल्या अनिल देशमुखांना आपली याचिका नव्याने सादर करावी लागणार आहे. या याचिकेच्या वैधतेवरच केंद्र सरकारने जोरदार आक्षेप नोंदवला होता. या याचिकेची सुनावणी खंडपीठाकडे वर्ग करण्याची मागणी केंद्र सरकारतर्फे सॉलिसटर जनरल तुषार मेहता यांनी केली होती.



सध्या मुंबई उच्च न्यायालयात ईडीच्या कारवाईविरोधात सुरू असलेल्या सर्व याचिका या खंडपीठापुढे सुरू आहेत. त्यामुळे नियमानुसार एका न्यायमूर्तींचे एकलपीठ ही याचिका ऐकू शकत नाही, असा दावा एएसजी अनिल सिंह यांनी केला होता.

## चिमुकलीवर अत्याचार; पालघरमधील घटना

**पालघर : प्रतिनिधी**

मुंबईच्या निर्भया बलात्कार हत्याकांडाला काही दिवस उलटत नाही तोच पालघर जिल्ह्याच्या बोईसर परिसरात एका पाच वर्षीय चिमुकलीवर अल्पवयीन मुलाने अतिप्रसंग केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

मुलीच्या नातेवाईकांनी तक्रार दिल्यानंतर या प्रकरणी बोईसर पोलीस ठाण्यात अल्पवयीन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुलीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या तिची प्रकृती स्थिर आहे. आरोपी अल्पवयीन असल्याने त्याला बाल न्यायालयासमोर हजर केले जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## गुन्ह्यांवरून एखाद्या समाजाला लक्ष्य करणे अयोग्य –चंद्रकांत पाटील

**पुणे : प्रतिनिधी**

मुख्यमंत्र्यांनी परप्रांतीयांना उद्देशून दिलेल्या आदेशाचा भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी समाचार घेतला आणि असे एखाद्या समाजाला लक्ष्य करणे योग्य नाही, असे ठणकावले. ते मंगळवारी (दि. १४) पुण्यात पत्रकारांशी बोलत होते.

साकीनाका निर्भया प्रकरणानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पोलीस महासंचालक कार्यालयात आयोजित बैठकीत महिलांच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड करणार नसल्याचे सांगतानाच परप्रांतातून येणाऱ्या लोकांच्या नोंदी ठेवण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. याविषयी चंद्रकांत पाटील म्हणाले की, केवळ परप्रांतीयच अशा प्रकारचे गुन्हे करतात का, याचा विचार करावा. अशा प्रकारे एखाद्या समाजाला टार्गेट करण्यात काही अर्थ आहे, असे आपल्याला वाटत नाही.

#### परप्रांतीयांच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्र्यांना टोला

शक्ती कायद्याला सर्वांनीच पाठिंबा दिला पाहिजे. फक्त सरकारसाठी माझा एकच प्रश्न आहे. कोरोनाच्या काळात शक्ती कायद्यावर बैठक करायला तर बंदी नव्हती ना? जर तुम्ही एकत्र बैठक करायला घाबरत होतात तर व्हर्च्युअल बैठक करायची होती, असे म्हणत चंद्रकांत पाटील यांनी महिला सुरक्षेच्या मुद्द्यावरून महाविकास आघाडी सरकारवर टीका केली आहे.

दरम्यान, आमदार अतुल भातखळकर यांनी परप्रांतीयांची नोंद ठेवण्याचे वक्तव्य म्हणजे दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. यासंदर्भात मी तक्रार दाखल करणार आहे. एका विशिष्ट समाजात द्वेष पसरवणे, भीती पसरवणे हा कायद्याने गुन्हा आहे, असे म्हटले आहे.

## रायगडात गौरी गणपतींना भावपूर्ण निरोप



(छाया : लक्ष्मण ठाकूर)



**अलिबाग, पनवेल : प्रतिनिधी**

लाडक्या गणपतीबाप्पाची पाच दिवस मनोभावे पूजाअर्चा केल्यानंतर रायगडकरांनी मंगळवारी (दि. १४) पुढल्या वर्षी लवकर येण्याचे आमंत्रण देऊन त्याला निरोपही दिला. पाहुण्या आलेल्या गौराईचा पाहुणचार झाल्यानंतर मंगळवारी त्यांचेही विसर्जन करण्यात आले. रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात ५६ हजार ५३५ गणेशमूर्ती, तर १४ हजार ४२९ गौरींचे विसर्जन करण्यात आले.

शुक्रवारी विघ्नहर्त्या गणेशाचे आगमन झाले. गणपती पाठोपाठ रविवारी गौराईचेही आगमन झाले होते. भक्तांनी त्यांची मनोभावे सेवा केली. गोडाधोडाचा नैवेद्य दाखवला. पूजा केल्यानंतर मनोभावे निरोप दिला. मंगळवारी दुपारी ४ वाजल्यापासून गणेशमूर्ती विसर्जनासाठी बाहेर काढण्यात आल्या. हातगाडी, रिक्षा, टेम्पो तर काही ठिकाणी डोक्यावरून गणेशमूर्ती विसर्जनस्थळी नेण्यात आल्या, मात्र कुठेही ढोलताशांचा गजर नाही. गुलालाची उधळण नाही की मिरवणुका नव्हत्या. शांततापूर्ण वातावरणात विसर्जन सोहळा पार पडला.

पनवेल महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे, खारघर, पनवेल, तळोजा या चारही प्रभागांमध्ये आयुक्त गणेश देशमुख यांच्या आदेशानुसार एकूण ६० ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली होती.

विसर्जन घाटावर गणेशमूर्तींची नोंदणी, अनाऊन्समेंट सिस्टीम, खबरदारीच्या दृष्टिकोनातून गणेशमूर्त्यांचे सॅनिटायजेशन आदी शिस्तबद्ध उपाययोजना करण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे गर्दी टाळण्यासाठी पालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या वतीने गणेश विसर्जन करण्यात आले. शहरातील नदीच्या ठिकाणांसह सोसायट्यांच्या आवारातदेखील कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात आली होती. दीड ते दोन फुटांपर्यंतच्या गणेशमूर्त्यांचे कृत्रिम तलावात विसर्जन करण्यात आले.

विसर्जनासाठी पालिकेच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या ऑनलाइन स्लॉट्स पद्धतीला गणेशभक्तांकडून उत्तम प्रकारे प्रतिसाद मिळाल्याचे पाहायला मिळाले. यामध्ये विसर्जनाच्या वेळेनुसार गणेशभक्त नमूद ठिकाणी विसर्जनासाठी उपस्थित राहिले.



# ...तर 'मविआ' सरकारला सळो की पळो करू!

## आमदार प्रवीण दरेकर यांचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपा-शिवसेना युती सरकाच्या काळात २०१७ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी झोपडपट्टी पुनर्वसन कायद्यामध्ये सुधारणा केली होती. त्यानंतर २०१८ मध्ये यांसदर्भात शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला व पात्रतेसंबंधाच्या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करण्याचे निश्चित करण्यात आले होते, परंतु महाविकास आघाडी सरकारकडून या निर्णयची तातडीने अंमलबजावणी होत नसल्यामुळे एसआरएमध्ये राहणाऱ्या हजारो कुटुंबीयांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. सरकारने आता याविषयी गांभीर्याने लक्ष घालून निर्णय घेतला नाही, तर भाजपच्या वतीने अधिक तीव्र आंदोलन करण्यात येईल. हे आंदोलन फक्त उपनगरापुरते मर्यादित न राहता संपूर्ण मुंबईतील झोपडपट्टीवासीय या आंदोलनात उतरतील आणि महाविकास आघाडी सरकारला सळो की पळो करून सोडतील, असा जोरदार इशारा विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी मंगळवारी (दि. १४) दिला.



झोपडवट्टीवासीयांना न्याय देण्यासाठी भाजप उत्तर मुंबईच्या वतीने बोरिवली देवीपाडा येथे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर व खासदार गोपाळ शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भव्य जनआंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. या वेळी मुंबई उपाध्यक्ष प्रकाश दरेकर, जिल्हा अध्यक्ष गणेश खणकर, बाबा सिंग, दिलीप पंडित, दिलीप उपाध्याय आदींसह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. विरोधी पक्षनेते दरेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, झोपडपट्टीमधील सर्वसामान्य रहिवाशांच्या वतीने मी खासदार गोपाळ शेट्टी यांचे आभार व्यक्त करतो. खासदार शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली आज खऱ्या अर्थाने गरिबांचा, स्थानिक राहिवाशांचा जिव्हाळ्याचा विषय हाती घेऊन रस्त्यावर आंदोलन करत सरकारकडून न्याय मागण्यासाठी अतिशय मोठे काम ते करीत आहेत. ज्या वेळी आपले आंदोलन गरिबांसाठी असते व ते प्रामाणिक असते त्या वेळी ते आंदोलन सर्वसामान्य जनतेचे असते.

दरेकर आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, उंच उंच टॉवरमध्ये नागरिक राहतात, पण त्यांना आपली गरज नाही, त्यांना चांगल्या सुविधा मिळतात, परंतु देवीपाडा भागातील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या सर्वसामान्य रहिवाशाला सुद्धा घर मिळाले पाहिजे हे त्यांचे आयुष्याचे फार मोठे स्वप्न असते. सरकारच्या आज अनेक एसआरएच्या स्कीम रखडल्या आहेत. या स्कीममध्ये असणाऱ्या अनेक नागरिकांना गेल्या अनेक वर्षापासून भाडे मिळत नाही. या स्कीममध्ये झोपडीमधील पोटमाळ्याच्या जागेचा प्रश्न अनुत्तरित असतो. त्यामुळे या सर्व महत्त्वाच्या विषयांना न्याय देण्यासाठी खासदार गोपाळ शेट्टी प्रयत्न करत असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले.

## उरणमध्ये पाच दिवसांच्या गणपतीसह गौरीचे विसर्जन



**उरण : वार्ताहर**

पाच दिवसांच्या मुक्कामानंतर मंगळवारी (दि. १४) गणरायाच्या सोबत गौरीचे विसर्जन करण्यात आले. उरण नगर परिषदेच्या वतीने मोरा जेट्टी, भवरा तलाव व उरण नगर परिषदेचा विमला तलाव येथे गणपती व गौरी विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली होती.

विमला तलाव येथे उरणच्या नगराध्यक्षा सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप उरण तालुका अध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, उरण शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शहा, मुख्याधिकारी संतोष माळी यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्था करण्यात आली होती.

देऊळवाडी युवक मंडळ व ग्रामस्थ यांच्या वतीने गणपती व गौरीचे विसर्जन करण्यात आले. सिव्हील डिफेन्सचे विलास पाटील व टीम, उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र बुधवंत यांच्या मार्गदर्शनाखाली कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. उरण नगर परिषदेचे आरोग्य निरीक्षक हरेश तेजी यांच्यासह १० कर्मचारी विसर्जनस्थळी उपस्थित होते. दरम्यान, जिल्ह्यात विविध ठिकाणी गणपतीसह गौरीचे उत्साहपूर्ण वातावरणात विसर्जन झाले. कोरोनाचे निर्बंध पाळून गणेशभक्तांनी शासकीय यंत्रणांना सहकार्य केले.



**पनवेल : येथील ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांच्या वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी अन्य पत्रकार उपस्थित होते.**



**पनवेल : डॉ. भाग्यश्री महेंद्र भोईर यांनी मॅनेजमेंट विषयात पीएच.डी. यशस्वीरीत्या पूर्ण करून पदवी संपादित केल्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले. या वेळी पंचायत समिती सदस्य तथा भाजप महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, रामदास घरत, महेंद्र भोईर, प्रणिता घरत आदी उपस्थित होते.**

## राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक गुरुगौरव पुरस्काराने सुशील जाधव सन्मानित

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सानपाडा कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड टेक्नॉलॉजीचे सहाय्यक प्राध्यापक सुशील जाधव यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक गुरुगौरव पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी संस्थेच्या वतीने ऑनलाईन राज्यस्तरीय शिक्षक सन्मान सोहळा झाला. महाराष्ट्रातून निवडलेल्या १५१ शिक्षकांचा मानाचा फेटा, मानकरी



बॅच, महावस्त्र, गौरवपदक, सन्मानचिन्ह आणि मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

गुणिजन परिवाराचे संस्थापक अध्यक्ष अॅड. कृष्णाजी जगदाळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सोहोळयात समाजसेवक पद्मश्री डॉ. विजयकुमार शहा, व्याख्याते डॉ. सुशील कुमार सिंग, शिक्षणतज्ज्ञ हेमाली जोशी, पर्यावरण कार्यकर्त्या स्मायली घोषाल, शिक्षणतज्ज्ञ सुविद्या सुकुमार, मलेशियाच्या शिक्षिका चिंतामली, शिक्षण संशोधक रोशनी वायकोम आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी गुणिजन परिवाराचे प्रकाश सावंत, लक्ष्मण दाते, चंद्रहास गावंड, नारायण वाणी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन मनीषा कदम यांनी केले.

## वैकुंठवासी शंकर सखाराम पाटील यांच्या स्मरणार्थ पाच लाखांची देणगी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वैकुंठवासी शंकर सखाराम पाटील यांच्या स्मरणार्थ भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील व ह.भ.प. आनंदीबाई पाटील यांच्याकडून नेरे गावातील हनुमान मंदिराच्या नवीन बांधकामासाठी सुरुवातीला दोन लाख व आता तीन लाख असे एकूण पाच लाख रुपयांची देणगी देण्यात आली.

मंदिर जीर्णोद्धारासाठी केलेल्या या मदतीबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले. या वेळी सरपंच राजश्री म्हस्कर, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश घाडगे, एकनाथ पाटील, वर्षा पाटील, तसेच डॉ. रोशन पाटील, सुजय पाटील, अथर्व पाटील, जगदिश म्हस्कर, विक्रांत म्हस्कर, अमित गवते, किशोर खाटके, विजय भालेकर, रोशन पाटील, तेजस जाधव, निलेश पाटील, संतोष चोरघे, स्वराज गवते, जजित गवते, हर्षल गवते, यश पाटील, नितीन पवार, भाऊ गायकर आदी उपस्थित होते.

## गणेश दर्शन



**कामोठे : सुषमा पाटील विद्यालयाचे चेअरमन दिलीप पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती.**




**मधुकर कोळी, बेलपाडा**



**महेंद्र विष्णू ढवळे, कुंभारवाडा, म्हसळा**



**केशव माळी, केवाळे**



**उरण नगर परिषद उपनगराध्यक्ष जयविन कोळी, मोरा**



**भाजपचे अनेश ढवळे यांनी विविध ठिकाणी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले.**




पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
बुधवार, दि. १५ सप्टेंबर २०२१ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
९. आरोग्य उपकेंद्र ६, रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, कामोठे
१०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
११. तळोजा शाळा, तळोजा गाव
१२. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
१३. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१४. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१५. श्री. गणेश विद्यामंदिर प्राथमिक शाळा नंबर ६, धाकटा खांदा
१६. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१७. आगरी शाळा, खांदा कॉलनी
१८. सुधागड कॉलेज, कळंबोली
१९. न्यु इंग्लिश स्कूल, कळंबोली
२०. दत्तुशेठ पाटील हायस्कूल, कामोठे
२१. सेंट्रल रेल्वे, पनवेल
२२. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२३. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल

पनवेल ग्रामीण लसीकरण

१. वळवली, रा.जि.प. शाळा
२. रोहिंजण, रा.जि.प. शाळा
३. मुर्बी, रा.जि.प. शाळा
४. कोयनावेळे, रा.जि.प. शाळा
५. पालेखुर्द, रा.जि.प. शाळा
६. पेंधर, रा.जि.प. शाळा
७. तळोजा मजकुर, रा.जि.प. शाळा
८. कळंबोळी काळभौरव मंदिर सभागृह
९. आसुडगाव, रा.जि.प. शाळा
१०. जुई गाव, रा.जि.प. शाळा

निर्देशित केलेल्या लसीकरण केंद्रांवर पहिल्या डोसकरिता १५० व दुसऱ्या डोसकरिता ५० डोस उपलब्ध असतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी. (वेळ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत)

# नवी मुंबईत फेरीवाल्यांमुळे वाहतूक कोंडी

## कोरोना निर्बंध शिथिलीकरणानंतर समस्या आणखी गंभीर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आधीपासूनच असलेली फेरीवाल्यांची समस्या कोरोना निर्बंध शिथिलीकरणानंतर आणखी गंभीर झाली आहे. नवी मुंबईत २१३८ इतकेच परवानाधारक फेरीवाले आहेत, मात्र शहरातील एका प्रभागातही यापेक्षा अधिक फेरीवाल्यांची संख्या झाली आहे. त्यांनी पदपथासह रस्त्यांवर ताबा घेतल्याने वाहतूक कोंडीसह सुरक्षा अंतराचा प्रश्न निर्माण होत आहे.



ठाणे महापालिकेतील एका महिला अधिकाऱ्यावर फेरीवाल्यांकडून नुकताच प्राणघातक हल्ला करण्यात आला. नवी मुंबईतही असे यापूर्वी अनेक प्रकार घडलेले आहेत. कोपरखैरणेतील एका फेरीवाल्याने कढईतील गरम तेल अंगावर टाकण्याचा प्रकार यापूर्वी घडला होता, तसेच सीवूड्स विभागात पथकातील सुरक्षा रक्षकाला मारहाण झाल्याची ताजी घटना आहे.

नेरूळ रेल्वे स्थानकाबाहेरील फेरीवाले व पालिका अधिकाऱ्यांमध्ये झालेल्या वादात अधिकाऱ्यावर कोयत्याने हल्ला केल्याचा गंभीर प्रकारही घडला आहे. शहरातील आठही विभागांत मोठ्या प्रमाणात बेकायदा फेरीवाल्यांनी आपली दुकाने थाटली आहेत. महापालिकेचे फेरीवाला धोरण अद्याप पूर्णत्वास आले नसून शहरात फक्त २,१३८ परवानाधारक फेरीवाले आहेत, तर त्याच्या कित्येक पट बेकायदा फेरीवाले व्यवसाय करताना पाहायला मिळतात. सर्वच विभागात फेरीवाल्यांची संख्या वाढत आहेत.

काही ठिकाणी दुकानांत पोटभाडेकरूंची संख्याही वाढत आहे. वाशी सेक्टर ९, १० परिसरातही फेरीवाल्यांची संख्या मोठी आहे. नेरूळ, सीवूड्स, वाशी कोपरखैरणेसह विविध विभागांत फेरीवाल्यांनी पदपथ व रस्त्यावर आपली दुकाने थाटली आहेत. सामान्य नागरिकांना विचारणा केली दमदाटी होत असल्याच्या तक्रारीही आहेत. उच्च न्यायालयाने रेल्वेस्थानकापासून दीडशे मीटरपर्यंतच्या हद्दीत फेरीवाल्यांना बसण्यास मनाईचा निर्णय दिला आहे. असे असताना नवी मुंबईतील रेल्वेस्थानकाबाहेर फेरीवाल्यांनी आपले बस्तान बसवले आहे, तसेच चौक, गर्दीची ठिकाणे अडवली जात आहेत. कोरोनानंतर महापालिकेने फेरीवाल्यांवर कारवाई केल्याची मोठी घटना एकिवात नाही. कारवाईकडे दुर्लक्ष होत असल्याने ही समस्या आणखी गंभीर होत चालली आहे. शहरात परवानाधारक फेरीवाल्यांची संख्या २१३८ आहे, तर ७३२५ फेरीवाल्यांची नोंदणी फेरीवाला धोरणानुसार प्रक्रियेत असल्याची माहिती परवाना उपायुक्त श्रीराम पवार यांनी दिली.

**नवी मुंबई शहरात बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात येते. पालिकेच्या पथकातील कर्मचाऱ्यांनाही मारहाण झाल्याच्या घटना घडल्या आहेत. कायदा हातात घेतल्यास पालिकेकडून नियमानुसार संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. विभाग अधिकाऱ्यांमार्फत बेकायदा फेरीवाल्यांबाबत कारवाई करण्यात येईल.**

**–अभिजित बांगर, आयुक्त, महापालिका, नवी मुंबई**

## भाजपतर्फे गणेशोत्सव मंडळांना समई वाटप





**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका नगरसेविका संजना समीर कदम यांच्या माध्यमातून वास्तुविहार केएच २, पारिजात को–ऑप हौसिंग सोसायटी, वास्तुविहार केएच १ को–ऑप हौसिंग सोसायटी व परिसरातील सर्व सोसायटीतील गणेशोत्सव मंडळांना दीपज्योती (समई) वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमाची सुरुवात कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते व नगरसेविका संजना कदम यांच्या हस्ते करण्यात आली.

या वेळी या कार्यक्रमासाठी माजी तालुकाध्यक्ष तानाजी खंडागळे, महाराष्ट्र प्रदेश युवा मोर्चा सदस्य प्रशांत कदम, पनवेल शहर माजी सचिव प्रदीप देशमुख, देविदास खेडकर त्याचप्रमाणे वास्तुविहार केएच २ को–ऑप हौसिंग सोसायटीचे अध्यक्ष समीर कदम, सचिव अरुण म्हात्रे, खजिनदार अजिनाथ वायभासे, उत्सव समितीचे सचिव मोहन मोरे, आदिनाथ डमाळे, युवा मोर्चा पदाधिकारी सुशांत पाटोळे, प्रथमेश मोरे, अविनाश नलावडे व सोसायटीतील रहिवासी उपस्थित होते.

## उरणमध्ये लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या नेत्रचिकित्सा केंद्राचे आज उद्घाटन

**उरण : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. सुहास हळदीपूरकर यांचे लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून उरण तालुक्यातील डाऊरनगर येथे माफक दरात नेत्रतपासणी केंद्र सुरू होत आहे. आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत या नेत्रचिकित्सा केंद्राचे उद्घाटन बुधवारी (दि. १५) सकाळी १०.३० वाजता होणार आहे.


हे केंद्र उरणमधील डाऊरनगरच्या नंगे शाह बाबा दर्ग्यासमोरील श्री कॉम्प्लेक्स येथे स्थापन होणार आहे. उरण तसेच आजूबाजूच्या सर्व ग्रामीण भागातील रुग्णांसाठी ही अत्यंत मोलाची सेवा उपलब्ध होणार आहे. या नेत्रचिकित्सा केंद्रावर तपासणीनंतर चष्मे सुद्धा माफक दरामध्ये उपलब्ध होणार असून मोतिबिंदू असणाऱ्या रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी ट्रस्टच्या पनवेल येथील रुग्णालयात पाठविण्यात येईल.

लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट ही रायगड जिल्हातील सेवा देणारे सर्वांत मोठे केंद्र आहे. परिसरातील गरजू रुग्णांनी या केंद्राचा उपयोग करून घ्यावा, असे आवाहन लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टतर्फे करण्यात येत आहे.

## रिटघर येथे ४७ वर्षांपासून एक गाव, एक गणपतीची परंपरा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील रिटघर या गावामध्ये ४७ वर्षांपासून एकच गणपती बसविण्याची परंपरा आहे. रिटघर या गावात ४७ वर्षांपासून एक गाव, एक गणपती बसविला जातो. त्यामुळे गावात सर्वजण मतभेद विसरून गणपतीच्या आरतीला, तसेच गणेशाच्या सेवेला हजर होतात. २०१६चा विघ्नहर्ता पुरस्कारदेखील या रिटघरच्या राजाला मिळाला.



रिटघर येथे १९७५मध्ये पहिल्यांदा एक गाव एक गणपतीची संकल्पना मांडण्यात आली व त्याच वर्षापासून गावातील मंदिरात एक गणपती बसविण्यात आला. अनाठायी होणारा खर्च कमी व्हावा व आनंदाची प्राप्ती व्हावी, तसेच संपूर्ण गाव एकत्रित यावा यासाठी गावातील नागरिकांनी १९७५ मध्ये एक गाव, एक गणपती सुरू केला. गावातील हनुमान मंदिरात दरवर्षी गणेशाची मूर्ती बसविली जाते. या मंदिरात सर्व आबाल वृद्ध, ग्रामस्थ, लहान मोठे, महिला हजर असतात. रिटघरचा राजा म्हणून प्रसिद्ध असलेल्या या गणपतीच्या दर्शनासाठी अनेक जण बाप्पा समोर आपले गाऱ्हाणे मांडत असतात. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या वाढत्या प्रतिसादातही 'एक गाव एक गणपती' ही परंपरा रिटघर गावाने ४७ वर्षे अबाधित ठेवली आहे. राजकारण बाजूला ठेऊन सर्व पक्षांचे प्रतिनिधित्व करणारे कार्यकर्ते गणेशोत्सवासाठी मात्र गावाचा गणपती म्हणून एकत्र काम करतात.

रिटघर गावाने 'एक गाव एक गणपती' ठेऊन समाजापुढे एक वेगळाच आदर्श ठेवला आहे. सार्वजनिक गणेशोत्सव सोहळा आनंदात पार पाडण्यासाठी संपूर्ण रिटघर गाव आनंदाने, एकजुटीने यात सहभागी होतो. घरोघरी गणेशोत्सव न साजरा करता या काळात ग्रामस्थांनी बसविलेल्या गणपतीचे अनंत चतुर्दशीच्या दिवशी विसर्जन केले जाते. यामुळे गावकऱ्यांमध्ये एकोपा टिकून राहत असल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली.



**पनवेल : पत्रकार संजस कदम यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**

## गणेश दर्शन



ज्येष्ठ छायाचित्रकार शेखर भोपी यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे पत्रकार संजय कदम यांनी दर्शन घेतले.



पत्रकार सुनील पोतदार यांच्या घरातील विराजमान बाप्पाचे पत्रकार संजय कदम, अरविंद पोतदार, राकेश पितळे, रूपेश पितळे यांनी दर्शन घेतले.



उरण : नागाव रोड येथील मालुसरे यांच्या घरातील विराजमान गौरीचे सुबोध दर्णे व शरू दर्णे यांनी दर्शन घेतले.



पनवेल : भगत आळी येथील भगत कुटुंबीयांच्या घरातील विराजमान गौरी.



अमित कोळी, कोळीवाडा, उरण



रोशन शिवराम म्हस्कर, नारपोळी, सोमाटणे, पनवेल



बांधपाडा ग्रामपंचायतीचे सरपंच विशाखा प्रशांत ठाकूर यांच्या घरातील विराजमान गणेशमूर्ती




अमित ढोले, उरण




रवींद्र ठाकूर, दिघोडे, उरण




गजानन देशमुख, नवीन पनवेल



डॉ. किशोर सिनकर, खांदा कॉलनी



डॉ. जनार्दन महिसरे, नवीन पनवेल



दत्तात्रेय ठाकूर, दिघोडे, उरण



अनिल वरे, मोठे भिंगार, पनवेल



गणेश पांडुरंग सोमासे, उलवे, नवी मुंबई



कामोठे : मीनल वसमतकर यांच्या घरातील विराजमान गौरी.



एनएमजीकेएस संघटनेचे सरचिटणीस वैभव पाटील यांच्या घरातील विराजमान बाप्पा.



गजानन ठाकूर, भेंडखळ, उरण

## संपादकीय

# आता निवडणुकीचे पडघम

कोरोना महासाथीच्या तिसऱ्या लाटेची प्रतीक्षा करत असतानाच अखेर राज्यातील पोटनिवडणुकांचा कार्यक्रम ओबीसी आरक्षणाविनाच जाहीर करण्यात आला आहे. या निवडणुका पुढे ढकलण्यासाठी सत्ताधारी महाविकास आघाडीने जंग जंग पछाडले होते, तसेच अन्य राजकीय पक्षांनी देखील ओबीसी आरक्षणाचा तिढा सुटेपर्यंत निवडणुका होऊ न देण्याचा चंग बांधला होता. तथापि राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावर बोट ठेवत प्राप्त परिस्थितीत निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला.

**धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम आणि नागपूर या जिल्हा परिषदा, तसेच त्यांच्या अंतर्गत स्थगित करण्यात आलेल्या पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुका पाच ऑक्टोबर रोजी घेण्यात येणार आहेत. या पाचही जिल्हा परिषदा कोरोना रुग्णसंख्येच्या निकषानुसार लेव्हल १ मध्ये येतात. पालघर जिल्हा परिषद आणि त्या अंतर्गत असलेल्या पंचायत समित्यांसाठी निवडणुका इतक्यात न घेण्याचा राज्य निवडणूक आयोगाचा मानस होता. कारण पालघर जिल्हा लेव्हल ३ मध्ये समाविष्ट होता. नव्या निवडणूक कार्यक्रमानुसार पालघर जिल्हा परिषदेच्या निवडणुका देखील ५ ऑक्टोबर रोजीच होतील. या सर्व ठिकाणी दुसऱ्या दिवशी म्हणजे ६ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होऊन फैसला होईल. ओबीसी आरक्षणाचा तिढा इतक्यात सुटणारा नाही किंबहुना हा प्रश्न कधी सुटेल किंवा सुटेल की नाही याची शाश्वतीदेखील उरलेली नाही. हे वास्तव स्वीकारणे सर्वच पक्षांना अवघड जात आहे. ओबीसी आरक्षणाविना निवडणुका होऊ देणार नाही असा पवित्रा भारतीय जनता पक्षाने देखील घेतला होता. त्यासाठी राज्यभर उग्र आंदोलने झाली व पुढेही होतील. त्यानंतर कोरोनाचे कारण देऊन सत्ताधारी महाविकास आघाडीने राज्य निवडणूक आयोगास विनंतीवजा पत्र लिहून पोटनिवडणुका पुढे ढकलण्यास सांगितले. त्यासाठी साथरोगविषयक कायद्याचा वापर करण्यात आला, परंतु सर्वोच्च न्यायालयाने ९ सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणीत राज्य सरकारचे कोरोनाविषयक निर्बंध पोटनिवडुकांसाठी लागू होत नसल्याचा निर्णय दिला. त्यानुसार निवडणुकांचा कार्यक्रम पुढे चालू ठेवण्याबाबत राज्य निवडणूक आयोगास आदेश मिळाल्याने या निवडणुका होत आहेत. निवडणूक आयोगाच्या या स्वच्छ भूमिकेमुळे महाविकास आघाडीचे धाबे दणाणले आहे हे निश्चित. सत्ताधारी आघाडीला हा मोठाच धक्का मानायला हवा. कारण गेली सुमारे दोन वर्षे सत्ताधारी आघाडीने राज्यभर जो खेळखंडोबा मांडला, त्याचे थेट परिणाम त्यांना या पोटनिवडणुकीत भोगायला लागणार आहेत. इम्पिरिकल डेटा गोळा करून ओबीसी आरक्षण परत मिळवल्याशिवाय पोटनिवडणुका घेणार नाही, असे छातीठोकपणे महाविकास आघाडीचे मंत्री दोन दिवसपूर्वीपर्यंत सांगत होते. त्यांची तोंडे आता गप्प होतील. भारतीय जनता पक्षाने येईल त्या परिस्थितीत पोटनिवडणुकीच्या रिंगणात दोन हात करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकार बडबड खूप करते, परंतु कृतीमध्ये मात्र त्याचे कुठलेही प्रतिबिंब उमटत नाही अशी प्रखर टीका विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी केली. त्यांचे म्हणणे कोणालाही पटावे असेच आहे. सर्वोच्च न्यायालयाचा बडगा पाठीत बसल्यावर जाग्या झालेल्या महाविकास आघाडी सरकारने घाईघाईने बैठका बोलावण्याचा धडाका सुरू केला आहे, परंतु आता त्यांना चांगलाच उशीर झाला आहे. आगामी पोटनिवडणुकांमध्ये महाविकास आघाडी सरकारच्या आजवरच्या तथाकथित कारभाराचा हिसाबकिताब होईल आणि जनताच त्यांचे कान उपटेल अशी चिन्हे आताच दिसू लागली आहेत.**

# अभियांत्रिकी क्षेत्रातील अमूल्य रत्न : सर विश्वेश्वरैय्या

'१५ सप्टेंबर' हा दिवस संपूर्ण भारतभरात 'अभियंता दिन' म्हणजेच 'इंजिनियर्स डे' म्हणून साजरा करण्यात येतो. या विशेष दिनी अभियांत्रिकी प्रगतीचा आढावा घेत असताना एक बाब विशेषत्वाने जाणवली की आपल्या अभियंत्यांनी केवळ भारतातच नव्हे, तर जगाच्या पाठीवर सर्वत्र आपल्या कार्याद्वारे विशेष मोहर उमटवली आहे आणि तीदेखील सर्व क्षेत्रात. फार विरळा क्षेत्र असं असावं जेथे अभियांत्रिकी ज्ञान वापरले जात नाही आणि या कारणाने 'अभियांत्रिकी दिन' हा सर्वांनी साजरा करायला हवा, असं जाणवलं.

'नाईट कमांडर ऑफ दी ऑर्डर ऑफ दी इंडियन एम्पायर' म्हणून संबोधल्या जाणाऱ्या सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांचा १५ सप्टेंबर १८६१ हा जन्मदिन! अभियांत्रिकी क्षेत्रात त्यांचे कार्य त्या काळी 'अद्वितीय' आणि अत्यंत महत्त्वपूर्ण म्हणून गणले गेले. त्यांच्या सन्मानार्थ त्यांचा जन्मदिवस हा भारतात 'इंजिनियर्स डे' म्हणून साजरा करण्यात येतो. त्यांच्या अभियांत्रिकी कार्याच्या गौरवार्थ १९५५मध्ये त्यांना 'भारतरत्न' हा भारतातील सर्वोच्च सन्मान मिळाला. आजदेखील त्यांच्या 'पायोनियरिंग' अशा परिवर्तनात्मक कार्यास संशोधनकार्यात विशेषत्वाने उल्लेखले जाते. त्यांच्या एकंदरीत कार्याची व्याप्ती बघता जाणवतं की एक रोल मॉडेल म्हणून त्यांचं व्यक्तिमत्त्व उलगडून जगासमोर मांडत राहायला हवं आणि एका प्रकारचा कॅलिडोस्कोपिक अनुभव घेत राहावा.

एक संस्कृत विद्वान, हिंदू ग्रंथांचे भाष्यकार आणि 'आयुर्वेदिक वैद्य' अशा विविध क्षेत्राद्वारे समाजाची सेवा करणाऱ्या श्रीनिवास शास्त्री आणि त्यांना त्यांच्या कार्यात मोलाची साथ देणाऱ्या वेंकटलक्ष्म्मा यांचे 'सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या' हे सुपुत्र! वयाच्या केवळ पंधराव्या वर्षी त्यांचे पितृछत्र हरवले आणि स्वबळावर अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रगतीच्या वाटेवर ते चालत राहिले. सीओईपी म्हणजेच अर्थात कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग, पुणे येथे त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले आणि प्रत्येक ठिकाणी उच्च श्रेणी प्राप्त करत गेले.



विश्वेश्वरैया यांच्या संशोधनातून निर्माण झालेल्या खडकवासला येथील जुन्या दगडी बांधकामाच्या धरणामध्ये लागू झालेली, पाण्याचा अपव्यय टाळणारी, स्वयंचलित शीर्षद्वाराची यंत्रणा वाखाणली गेली आणि सर्वदूर त्यांना ओळखले जाऊ लागले.

एक अभियंता म्हणून विश्वेश्वरैया यांची वाटचाल दमदार होती. त्यांच्या उत्कृष्ट अशा उल्लेखनीय कार्यशैलीने त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात विशिष्ट प्रभाव निर्माण केला. स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये पदवी प्राप्त केल्यानंतर विश्वेश्वरैया यांनी मुंबई येथे सार्वजनिक बांधकाम विभागात नोकरी केली. त्यानंतर त्यांना भारतीय पाटबंधारे महामंडळ येथून आमंत्रित करण्यात आले. त्यांनी दक्षिण क्षेत्रात पाटबंधाऱ्याची एक अतिशय क्लिष्ट योजना राबविली. विश्वेश्वरैया यांनी 'सांडव्याची स्वयंचलित पूरनियंत्रण द्वार' प्रणाली विकसित केली व त्याचे पेटेंट घेतले, जी यंत्रणा सन १९०३ मध्ये पहिल्यांदा पुण्याजवळील खडकवासला धरणास लावण्यात आली. या नावीन्यपूर्ण टेक्निकद्वारे धरणातील साठ्याची पूरपातळी पूर आल्यानंतरदेखील धरणास कोणताही धोका न होता उच्चतम स्थितीस वाढविण्यास वापरण्यात आलीत. या द्वारांच्या कामात मिळालेल्या यशामुळे, ती टिग्रा धरण, ग्वाल्हेर व कृष्णराज सागर धरण, म्हैसूर येथे बसविण्यात आली. विश्वेश्वरैया यांनी हैदराबाद शहराचे पुरापासून संरक्षण करण्यासाठी जी प्रणाली विकसित केली, त्यानंतर अनेक मोठ्या आणि महत्त्वपूर्ण प्रकल्पात विश्वेश्वरैया यांच्या प्रणालीचा समावेश करण्यात आला. विशाखापट्टणम बंदरास समुद्री पाण्यापासून गंजरोधक करण्याची प्रणाली तयार करण्यातही विश्वेश्वरैया यांनी



पुढाकार घेतला आणि या प्रकल्पातदेखील त्यांचं योगदान अग्रगण्य ठरलं.

सन १९०८ मध्ये स्वेच्छा-निवृत्तीनंतर म्हैसूर या भारतातील मोठ्या व महत्त्वाच्या राज्याचे दिवाण म्हणून विश्वेश्वरैया यांना नियुक्त केले गेले. कृष्णराज वोडेयार (चतुर्थ) या म्हैसूरच्या महाराजांचा त्यांनी विश्वास प्राप्त केला आणि राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी निर्विवाद महत्त्वपूर्ण असे योगदान दिले. इतर अनेक कामांसोबत विश्वेश्वरैया यांनी १९१७ मध्ये बंगलोर येथील 'शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय' स्थापित केले. आजही भारतातील एक प्रथम अभियांत्रिकी संस्था म्हणून ती ओळखली जाते. सर मो. विश्वेश्वरैया यांनी कावेरी नदीवर कृष्णराजसागर धरण बांधण्याच्या प्रस्तावापासून ते निर्मितीपर्यंत, संपूर्ण प्रकल्प हाताळला. या धरणाचे निर्मितीकार्यदेखील अत्यंत उल्लेखनीय असे ठरले आणि त्याद्वारे आशियातील सर्वात मोठे सरोवर तेथे निर्माण झाले, ज्यामुळे सर मो. विश्वेश्वरैया यांना 'म्हैसूर राज्याचे पिता' म्हणून ओळखले जाऊ लागले. म्हैसूर राज्यातील त्यांच्या कार्यकालादरम्यान त्यांनी म्हैसूर सोप फॅक्टरी, कीटकनाशक प्रयोगशाळा, भद्रावती आयर्न व स्टील वर्कस्, श्री जयचमाराजेंद्र पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट, बंगलोर ॲग्रीकल्चरल युनिव्हर्सिटी, स्टेट बँक ऑफ मैसूर, सेंचुरी क्लब, मैसूर चेंबर ऑफ कॉमर्स असे अनेक औद्योगिक प्रकल्प सुरू केले. तीरुमला-तीरुपती रस्ते बांधणीतदेखील विश्वेश्वरैया यांचे योगदान होते. त्यांनी सदैव औद्योजक क्षेत्रातील खाजगी गुंतवणुकीवर भर दिला. प्रामाणिकता, वेळेचे नियोजन, कार्याप्रती पूर्ण समर्पण यासाठी विश्वेश्वरैया यांचे उदाहरण दिले जाते.

सुमारे सहा वर्षे मैसूर संस्थानचे 'दिवाण' या नात्याने उद्योग, कृषी आणि शैक्षणिक क्षेत्रात विश्वेश्वरैया यांनी नेत्रदीपक कामगिरी केली होती. त्यांनी सर्वप्रथम मैसूर आर्थिक परिषदेला स्थायी रूप देऊन अनेक विकासकार्ये मार्गी लावली. मैसूर बँक, मैसूर विद्यापीठ, प्रायमरी एज्युकेशन, कृषी विद्यापीठ, वृंदावन गार्डन, कन्नड साहित्य ॲकेडमी, आर्थिक आणि कार्यक्षमता लेखापरीक्षण इत्यादी मौलिक कार्य विश्वेश्वरैया यांच्या हातून घडलं.

सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांचे कावेरी प्रकल्पाचे निर्मितीकार्य जवळून बघण्याचा योग आला, तो इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोर येथे भेट दिली असताना. कूर्ग, मैसूर या ट्रिपमध्ये वृंदावन गार्डन, मैसूर पॅलेस, धरण आदी बघताना हे अनुभवले की या महान अभियंत्यांवर भाष्य करण्यास लहान, मोठे, सर्वजण उत्सुक होते.

सर विश्वेश्वरैय्या यांना अनेक पुरस्कार व सन्मान प्राप्त झाले. त्यांना मिळालेला 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान त्यांच्या कीर्तीत अधिकच भर पाडून गेला. म्हैसूर येथे कार्यरत असताना त्यांना जनतेसाठी केलेल्या कामांमुळे 'नाईट कमांडर ऑफ दी ऑर्डर ऑफ दी इंडियन एम्पायर' या सन्मानाने गौरविले गेले.

सर मो. विश्वेश्वरैया यांना आंतरराष्ट्रीय इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हिल इंजिनियर्स या लंडन स्थित संस्थेने सन्माननिय सदस्यत्व, तर 'इंडियन इंस्टिट्यूट ऑफ सायन्स'च्या बंगलोर शाखेने फेलोशिप प्रदान करून त्यांचा सन्मान केला. देशातील अनेक विद्यापीठांनी त्यांना 'डॉक्टर' ही अनेक विद्याशाखातली पदवी देऊन गौरविले. सन १९२३च्या इंडियन सायन्स काँग्रेसचे ते अध्यक्ष होते.

**-डॉ. शुभांगी रथकंठीवार**

# मिठाई दुकानदारांना बाप्पा पावला

## गणेशोत्सवात मिठाई खरेदी वाढली

**खोपोली : प्रतिनिधी**

यंदाचा गणेशोत्सव जरी निर्बंधात साजरा होत असला, तरी कोरोनाच्या ओसरलेल्या दुसऱ्या लाटेमुळे खालापूर तालुक्यात बाप्पांचे आगमन उत्साहात झाले असून, या वेळी मिठाई विक्री चांगली होत असल्याने मिठाई दुकानदारांना बाप्पा पावला आहे.

गतवर्षी कोरोनाचा प्रादुर्भाव मोठा असल्याने नियमात शिथिलता देण्यात आली नव्हती. सणासुदीलादेखील दुकाने बंद ठेवण्याची पाळी व्यावसायिकांवर आली होती. त्याचा मोठा आर्थिक फटका त्यांना सहन करावा लागला होता. यंदादेखील दुसऱ्या लाटेमुळे तीच परिस्थिती ओढवल्यास व्यवसाय बंद करण्याची पाळी येईल, अशी भीती अनेक दुकानदारांनी बोलून दाखवली होती. सुदैवाने तालुक्यात कोरोना संसर्गाला लागलेल्या ब्रेकमुळे या वेळी दुकानाच्या वेळा वाढवण्यात आल्या.



(छाया : विनायक पाटील)

खालापूर तालुक्यात सुमारे साडेपाचशेच्या आसपास मिठाई विक्रीची दुकाने असून, सणासुदीला होणारी मोठी उलाढाल यावर अनेकांचे व्यवसाय अवलंबून आहेत. गणपतीसाठी तयार करण्यात येणारी विविध प्रकारची मिठाई, मोदकाचे प्रकार याला दरवर्षी मोठी मागणी असते. यंदा बाप्पांच्या आवडीचे विविध प्रकारचे मोदक, तसेच इतर मिठाई खरेदीसाठी ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. ग्राहकांच्या प्रतिसादामुळे मिठाई विक्रेत्यांमध्ये यंदा बाप्पा पावल्याची भावना दिसत आहे. कंदी मोदक, काजू मोदक, चॉकलेट मोदक, खवा मोदक असे विविध प्रकारचे तीनशे रुपये किलोपासून साडेनऊशे रुपये किलो दराच्या मोदकांची विक्री मोठ्या प्रमाणात झाल्याने मिठाई व्यवसाय यंदा तेजीत आला आहे.

> **सणासुदीला मोठ्या प्रमाणात मिठाईची खरेदी होते. त्यामुळे यंदा गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडू दे, अशी इच्छा होती. ती बाप्पांनी पूर्ण केली. व्यवसायात गेल्या वर्षी मंदी असली, तरी कारागिरांचा पगार आणि इतर खर्च याचा ताळमेळ बसवताना नाकी नऊ आले होते. या वर्षी मात्र मिठाई विक्रीचा व्यवसाय तेजीत आहे.**
> **-राजू भोपतराव, मिठाई विक्रेता, चौक, ता. खालापूर**

# पिंगळसई गावातील देशमुख परिवाराचा एक कुटुंब एक गणपती

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील पिंगळसई गावातील देशमुख तरुण मंडळाने एक गाव एक गणपती हा शिरस्ता १२ पिढ्या म्हणजेच ३५० वर्षापासून अधिक काळ पारंपरिक पद्धतीने जोपसला आहे.

रोहे शहरापासून दीड ते दोन किमी अंतरावर पिंगळसई हे गाव आहे. या गावात मोठ्या संख्येने देशमुख कुटुंब आहेत. त्यातील काही सदस्य नोकरी व्यवसायासाठी परगावीही स्थायिक झाले आहेत, मात्र गणेशोत्सवाच्या निमित्ताने देशमुख कुटुबांतील सर्व सदस्य एकत्र येतात आणि मोठ्या भक्तिभावाने व गुण्यागोविंदाने गणेशोत्सव साजरा करतात. त्यासाठी येणारा खर्च देशमुख तरुण मंडळातील कुटुंब वर्गणी काढून करीत असतात.

या मंडळाच्या गणेश मिरवणुकीला रोहा शहरातून सुरुवात होते. देशमुख कुटुंबांतील प्रमुख ज्येष्ठ मंडळी, तरुण मंडळाचे कार्यकर्ते व लहान मुले मिरवणूक काढीत गणरायाला वाजतगाजत आपल्या पिंगळसई गावात आणतात. विधिवत पूजा करून आनंदमय वातावरणात गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात येते. आरतीसह अन्य आध्यात्मिक कार्यक्रमास देशमुख परिवारातील सर्व आबालवृद्ध, तसेच महिला सदस्य उपस्थित राहतात. भजन, कीर्तन, महिलांचे हळदीकुंकू, लहान मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम होतात. गेल्या वर्षाप्रमाणेच या ही वर्षी देशमुख तरुण मंडळ कोरोनाचे सर्व नियम पाळून गणेशोत्सव साजरा करीत आहे. गणेशोत्सवातील सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देशमुख परिवारांतील सदस्य जातीने लक्ष देऊन परिश्रम घेत आहेत.

(छाया : महादेव सरसंबे)



# नेरळमधील पोतदार कुटुंबाच्या गणेशोत्सवाला १३७ वर्षाची परंपरा

**कर्जत : बातमीदार**

मुंबईत गिरगावमध्ये राहणारे पोतदार कुटुंब नोकरीनिमित्त नेरळला आले. त्यांनी येथे सुरू केलेला पोतदार कुटुंबाचा गणपती बाप्पा यंदा १३७ वर्षाचा झाला आहे. पहिल्या वर्षी बनवलेली गणेशमूर्ती आजही पोतदार कुटुंब शाडूच्या मातीपासून घडवतात. बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी सुमारे ५०० पोतदार कुटुंब नेरळला येऊन जातात.



(छाया : संतोष पेरणे)

गिरगावातील पोतदार कुटुंब रेल्वेने जोडलेल्या नेरळ गावात वास्तव्यास आले. या पोतदार कुटुंबियांनी १८८४ साली आपल्या घरी प्रथम गणपतीची प्राणप्रतिष्ठा केली. त्या वेळची गणेशमूर्ती आणि आजची गणेशमूर्ती सारखीच आहे. यंदा त्यांच्या गणेशोत्सवाचे १३७वे वर्ष आहे. या पोतदार परिवारामध्ये सुमारे ५०० पेक्षा जास्त कुटुंबीय आहेत, ते सर्व सदस्य गणेशोत्सवाच्या निमित्ताने एकत्र येत असतात. विशेष म्हणजे गेल्या १३७ वर्षापासून श्री गणपती बाप्पाची मूर्ती शाडूच्या मातीची असते आणि आजही ती घरीच बनवली जाते. पोतदार कुटुंबाची साधारण सहावी पिढीदेखील आजही गणेशमूर्ती हाताने घडविण्याचे काम करीत आहे. पर्यावरणाला बाधक अशी कोणतीही सजावट अथवा मखर केली जात नाही.

गणेशोत्सवात रात्री जागरण केले जाते, त्या वेळी पट (सारीपाट) खेळण्याची पिढ्यान्‌पिढ्यांची परंपरा आजही जपली आहे. सर्व पोतदार कुटुंबीय सारीपाट आंनदाने खेळतात. विसर्जनाच्या आदल्या दिवशी पहाटे ललिताचा कार्यक्रम असतो आणि तोही पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात येतो, तसेच भजन व गाण्याचे कार्यक्रमदेखील केले जातात.

# रोह्यात हातभट्टीची दारू जप्त

## उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील गोपाळवठ धनगरवाडी, कारवीने धनगरवाडी व कारवीने ठाकूरवाडी येथील अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रावर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या रायगड व ठाणे येथील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी ११ व १२ सप्टेंबर रोजी केलेल्या संयुक्त कारवाईत हातभट्टीची दारू आणि रसायन मिळून एकूण दोन लाख सहा हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या धाडीदरम्यान एकूण सहा गुन्हे दाखल झाले असून एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे, तसेच ८० लिटर हातभट्टी दारू आणि सात हजार ४०० लिटर रसायनही जप्त करण्यात आले आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क खात्याचे मुरूड विभाग निरीक्षक आनंद पवार यांनी दिली.




(छाया : महादेव सरसंबे)

# कर्जत पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड

## एक लाख ११ हजार ३४० रुपये जप्त

**कर्जत : बातमीदार**

शहरात चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर कर्जत पोलिसांनी धाड टाकून १३ जणांवर कारवाई केली असून त्यांच्याकडून एक लाख ११ हजार ३४० रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.




कर्जत शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी जुगाराचा अड्डा सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार रविवारी (दि. १२) कर्जत शहरातील पाटील आळीत पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक राजू आल्हाट, सुभाष पाटील, पोलीस नाईक सचिन नरूटे, शिपाई भूषण चौधरी, आश्रुबा बेंद्रे, गणेश पाटील यांच्या पथकाने धाड टाकली. त्या वेळी मुद्रे येथील १३ जण जुगार खेळताना आढळले. त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले, तसेच एकूण एक लाख ११ हजार ३४० रुपये रोख रक्कम व जुगाराचे साहित्य पोलिसांनी जप्त केले. या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास हवालदार सुभाष पाटील करीत आहेत.

# एक्स्प्रेस वे वर वायुगळती

## ■ तत्काळ उपाययोजना झाल्याने संभाव्य दुर्घटना टळली

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

एक्स्प्रेस वे वरील आडोशी गावाजवळ मंगळवारी (दि. १४) सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास प्रोपोलिन गॅस भरलेल्या टँकरला कंटेनरने जोरदार धडक दिली. या अपघातानंतर टँकरमधील अतिज्वलनशील प्रोपोलिन वायूची गळती सुरू झाली, मात्र तत्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना झाल्याने संभाव्य दुर्घटना टळली.

मुंबई–पुणे एक्स्प्रेस वे वरील आडोशी गावच्या हद्दीत मुंबईकडे जाणाऱ्या प्रोपोलिन गॅस भरलेल्या टँकर (जिजे १२ एटी ५४९६) ला कंटेनरने जोरदार धडक दिली. या अपघातानंतर टँकरमधून मोठ्या प्रमाणात वायुगळती झाल्याने द्रूतगती महामार्गावरील वाहतूक थांबविण्यात आली.

(छाया : विनायक माडपे)





अपघाताचे वृत्त समजताच एक्स्प्रेस वे वरील सर्व आपत्कालीन यंत्रणा, बोरघाट पोलीस पथक, खोपोली अग्निशमन दल, पोलीस व अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक ग्रुपचे सदस्य घटनास्थळी दाखल झाले. वाहतूक पोलिसांनी वायुगळती निष्णांत धनंजय गीध यांना पाचारण केले. गीध आवश्यक साहित्य घेऊन रसायनी येथून घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी काही मिनिटांतच वायुगळती थांबविण्यात यश मिळविले. त्यानंतर वाहतूक पोलिसांनी क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त टँकर व कंटेनर महामार्गावरून बाजूला नेले. या दरम्यान एक्स्प्रेस वे वरील मुंबई–पुणे लेन काही वेळ वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आली होती.

# रायगडातील एसटी कर्मचारी आर्थिक विवंचनेत

## ना वेळेवर पगार, ना वैद्यकीय बिलांचा परतावा

**पेण : प्रतिनिधी**

कोरोना काळात एसटीची आर्थिक संकटात रुतलेली चाके आता काही प्रमाणात बाहेर येऊन पूर्वपदावर येत असताना कर्मचाऱ्यांपुढे मात्र पगार, तसेच वैद्यकीय बिलांच्या अभावी जगायचे कसे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. वेतनाअभावी एसटी कर्मचाऱ्यांना मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे.

कोरोना काळातील निर्बंधाचा फटका उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणात बसला, त्याचप्रमाणे एसटी महामंडळालादेखील मोठा आर्थिक फटका बसला आहे. प्रवासी व माल वाहतूक हेच उत्पन्नाचे प्रमुख मार्ग बंद असल्याने एसटीचा गाडा आणखी खोलात गेला. त्यातच राज्य शासनाकडून निधी उपलब्धतेत विलंब याचा परिणाम कर्मचाऱ्यांच्या पगारावरदेखील झाला आहे. वैद्यकीय बीलेदेखील रखडली असल्याने कर्मचाऱ्यांचा मनस्तापात आणखी भर पडली आहे.

कोरोनाकाळात एसटी कर्मचाऱ्यांचा वेतनाचा प्रश्न गंभीर झाला होता. आता एसटीची गाडी पुन्हा रस्त्यावर धावू लागली असली तरी वेळेवर पगार होत नसल्याने कर्मचाऱ्यांचे हाल होत आहेत. रायगड विभागातील महाड, श्रीवर्धन, पेण, माणगाव, अलिबाग, मुरुड, कर्जत, रोहा या आठ आगारात दोन हजार २७१ कर्मचारी काम करीत आहेत. यामध्ये ५०३ वाहक, ४९३ चालक असून, वर्ग दोनचे १९ अधिकारी व ८०६ प्रशासकीय व कार्यशाळा कर्मचारी यांचा समावेश आहे.

कोरोना काळातील निर्बंधामुळे एसटीची प्रवासी वाहतूक बंद होती. त्या काळात कर्मचाऱ्यांना पगार बंदच होता. निर्बंध शिथिल झाल्यानंतर प्रवासी व मालवाहतूक सेवा सुरु झाली. मात्र प्रवाशांच्या अल्प प्रतिसादामुळे अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. त्याचा परिणाम कामगारांच्या पगारावर झाला आहे. दरम्यान, कामगार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची वैद्यकीय सुविधेची बिलेदेखील वेळेत मिळत नसल्याने कामगार मेटाकुटीला आले आहेत. कोरोना काळात पगार बंद, आता पगार वेळेवर नाही, त्यात स्वतः च्या व कुटुंबातील सदस्यांच्या आजारपणाकडेदेखील दुर्लक्ष होत आहे.

> **महामंडळाकडील निधीच्या उपलब्धतेप्रमाणे कर्मचाऱ्यांचे पगार व वैद्यकीय बिले दिली जात आहेत.**
> **–अनघा बारटक्के, विभाग नियंत्रक, एसटी रायगड**



# मुरूडमध्ये गौरी-गणपतीला निरोप

(छाया : संजय करडे)



**मुरूड : प्रतिनिधी**

एक दोन तीन चार गणपतीचा जयजयकार, गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या, गणपती गेले गावाला चैन पडेना आम्हाला अशा घोषणांत मुरुड तालुक्यातील गणेशभक्तांनी मंगळवारी (दि. १४) गौरीगणपतीला निरोप दिला.

गेल्या पाच दिवसांपासून सकारात्मक ऊर्जा व आनंद देणाऱ्या गणरायाला निरोप देताना गणेशभक्त हळवे झाले असले, तरी त्यांच्या जल्लोषाला उधाण आले होते. मंगलमय वातावरणात मुरुड तालुक्यातील गणपतींचा विसर्जन सोहळा पार पडला. मंगळवारी सायंकाळी ४ वाजल्यापासून गणपती विसर्जनासाठी मुरुड समुद्रकिनारी आणण्यास सुरुवात झाली होती. या वेळी मुरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील २२५७ गणपती व ३५० गौरींचे विसर्जन करण्यात आले. विसर्जनस्थळी नगर परिषदेकडून दिवे लावण्यात आले होते. गणेशमूर्ती विसर्जन करण्याकरिता जीवरक्षक तैनात करण्यात आले होते. पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# पेणमध्ये एक लाख नागरिकांचे लसीकरण

## गरोदर व स्तनदा मातांनाही लसीचे दोन डोस

**पेण : प्रतिनिधी**

कोरोनाला प्रतिबंध घालण्यासाठी लसीकरण करण्यात येत आहे. यामध्ये कोविशिल्ड आणि कोव्हॅक्सिन या दोन लस दोन टप्प्यात देण्यात येत आहेत. पेणमध्ये आतापर्यंत एक लाखांच्यावर नागरिकांचे लसीकरण झाले आहे.

सुरूवातीला ४५ वर्षांवरील नागरिकांना लस देण्यात आली आणि त्यानंतर १८ वर्षांवरील युवकांचेसुद्धा लसीकरण करण्यात येऊ लागले आहे. पेण तालुक्यातील गरोदर व स्तनदा मातांनाही लस देण्यात येत असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली. पेण शहरातील ४५ ते १८ वर्षांवरील १६३७३ नागरिकांना कोविशिल्डचा आणि १०३१६ नागरिकांना कोव्हॅक्सिनचा पहिला आणि दुसरा डोस देण्यात आला असून आतापर्यंत एकूण २६६८९ नागरिकांचे लसीकरण करण्यात आले आहे.

पेण तालुक्यातील गडब, वाशी, जिते, कामार्ली या आरोग्य उपकेंद्रांवर ६७५५१ जणांना कोविशिल्ड आणि ७११३ नागरिकांना कोव्हॅक्सिनचे दोन डोस देण्यात आल्याने एकुण ७४६६४ जणांचे लसीकरण झाले आहेत. त्यामुळे आतापर्यंत पेण शहरासह तालुक्यातील जवळपास एक लाख १३ हजार ५३ जणांना लसीचे दोन्ही डोस देण्यात आले आहेत. तालुक्यातील गरोदर आणि स्तनदा माता मिळून एकूण ६४ महिलांचे लसीकरण केले आहे.

> **पेण तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी लसीकरण करून, कोरोनाच्या नियमांचेसुद्धा काटेकोरपणे पालन करावे.**
> **–डॉ. अपर्णा खेडेकर, तालुका वैद्यकीय अधिकारी, पेण**

# कोतवाल खुर्द येथील नवसाच्या गणपतीचे विसर्जन

## पोलादपूर तहसीलदारांकडे ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरची भेट

(छाया : शैलेश पालकर)





**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कोतवाल खुर्द गावातील उतेकर, सकपाळ परिवाराच्या नवसाच्या गणपतीचे दुपारी विसर्जन करण्यात आले. या गणेशोत्सवाचे यंदा १०१वे वर्ष असल्याने संपूर्ण उतेकर, सकपाळ परिवार या वेळी उपस्थित होता. तत्पूर्वी पोलादपूरच्या तहसीलदार दिप्ती देसाई यांच्याकडे तालुक्यातील कोरोना रुग्णांसाठी ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरचे एक युनिट भेट देण्यात आले.

पोलादपूर तालुक्यातील कोतवाल खुर्द येथे उतेकर, सकपाळ कुटुंबीयांची वस्ती आहे. गणेशोत्सव ते आळीपाळीने उत्साहात व एकोप्याने साजरा करतात. यंदा १०१व्या वर्षानिमित्त उतेकर, सकपाळ कुटुंबीयांनी मोठ्या स्वरूपात गणेशोत्सवाचे आयोजन केले होते. या गणेशमूर्तीचे दुपारी विसर्जन करण्यात आले. या वेळी तहसीलदार दिप्ती देसाई, नायब तहसीलदार शरद आडमुठे, ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर, सामाजिक कार्यकर्ते मंगेश शिंदे, उतेकर सकपाळ परिवारातील सदस्य व विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांचे स्वीय सचिव राहुल सकपाळ उपस्थित होते. या वेळी पोलादपूर तालुक्यातील कोरोना रुग्णांसाठी ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरचे एक युनिट भेट दिल्याबद्दल तहसीलदार दिप्ती देसाई यांनी उतेकर, सकपाळ कुटुंबीयांना धन्यवाद दिले.

# पाली सुधागडात गौरी–गणपतीला निरोप

## ■ नदी, तलावांत मूर्तींचे विसर्जन

(छाया : धम्मशील सावंत)



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात मंगळवारी पाच दिवसांच्या गणरायाला भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या वर्षी विसर्जनाच्या पारंपरिक पद्धतीत बदल करून विसर्जनस्थळी होणारी पूजा घरीच करण्यात आली.

सुधागड तालुक्यातील अनेक गणेशमूर्तींचे विसर्जन गावाच्या जवळील नदी व तलावात करण्यात आले. अनेकांनी श्रीची मूर्ती शाडू व पर्यावरणपूरक घेणे पसंत केले होते. त्यांनी घरीच मूर्तींचे विसर्जन केले.




## शेअर सर्टिफिकेट हरवलेबाबत

मी, शंकर पांडुरंग हजारे, रा. ३०२, तिसरा मजला, रिद्धी सिद्धी प्लाझा बिल्डींग, उरण नाका, पनवेल, पनवेल शहर, जि. रायगड ४१०२०६. मी पनवेल शहरात प्रवास करीत असताना माझेकडून खालील वर्णनाचे शेअर सर्टिफिकेट हरविले आहेत. त्याबाबत मी पनवेल शहर पोलीस स्टेशन येथे दिनांक ०८/०९/२०२१ रोजी प्रॉपर्टी मिसिंग रजिस्टरमध्ये हरविलेल्या कागदपत्रांची नोंद केली आहे. त्याचा प्रॉपर्टी रजिस्टर नं. १६११/२०२१ असा आहे.

**हरविलेल्या शेअर्स सर्टिफिकेटचे वर्णन–**

१) शॉप नं. A/10 अभिदीप अपार्टमेंट, उरण नाका, पनवेलचे शेअर सर्टिफिकेट नं. ११, रजिस्टर नं. २२७४/२००९–२०१० व ५१–५५ मेंबर्स रजि. नं. A/5-10A शेअर्स नं. ५

२) शॉप नं. A/12 अभिदीप अपार्टमेंट, उरण नाका, पनवेलचे शेअर सर्टिफिकेट नं. १३, रजिस्टर नं. २२७४/२००९–२०१० व ६१–६५ मेंबर्स रजि. नं. A/5-12 शेअर्स नं. ५

वरील शेअर्स सर्टिफिकेट माझेकडून गहाळ झालेले आहेत. ते जर कुणाला सापडल्यास त्याने माझे वरील पत्त्यावर अथवा ९३२२२९८२७० या फोन क्रमांकाशी संपर्क करावा. १० दिवसाचे आत शेअर सर्टिफिकेट न मिळाल्यास मला डुप्लीकेट शेअर सर्टिफिकेट्स मिळणेस पात्र राहीन.

**सही/–**
**शंकर पांडुरंग हजारे**
**९३२२२९८२७०**



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**Changu Kana Thakur Arts, Commerce and Science College, New Panvel (Autonomous)**

Plot No.- 1, Sector-11, Khanda Colony, New Panvel (W), Dist.-Raigad, State- Maharashtra, India, PIN.-410206

**Re-accredited 'A+' Grade by NAAC (CGPA 3.61, 3rd Cycle)**
**'College with Potential for Excellence' Status Awarded by UGC,**
**'Best College Award' by University of Mumbai,**
**ISO 9001:2015 (Quality Management System) /**
**ISO 14001:2015 (Environment Management System),**
**Green Certificate (Level III)**

## Department of Chemistry
## Ph.D. Notification 2021

**(Date of Advertisement: Wednesday, September 15, 2021)**

Applications are invited from the eligible candidates for the admission to the Ph.D. programme in the subject of Chemistry at Changu Kana Thakur Arts, Commerce and Science college, New Panvel, Plot No.-1, Sector-11, Khanda Colony, New Panvel, Raigad-410206.

**Eligibility :**
Candidates fulfilling one of the following criteria are eligible to apply for admission to the Ph.D. programme.
1. Qualified in PET (Ph.D. Entrance Test)
2. Qualified in Gate/Set/Net (JRF) Examination or Equivalent Examinations.

**Admission Process for the Ph.D. Programme :**

1. Eligible candidate shall apply in the prescribed form available in the college office and submit to the college office on or before Friday, September 24, 2021.
2. After scrutiny of the applications, a list of eligible candidate will be displayed on the notice board/website on Friday, September 24, 2021 after 06:00 p.m.
3. The eligible candidates will be interviewed by the Expert Committee on Saturday, September 25, 2021. The eligible candidates will be informed accordingly. The candidates have to give a brief presentation about their research idea/s on the day of interview.
4. The list of selected candidates will be displayed on the notice board and on the college website on Monday, September 27, 2021. The selected candidates will be informed accordingly.
5. The selected candidates shall have to submit the outline of their research proposal in consultation with his / her guide to the college along with the prescribed fees.
6. For more information please contact : Dr. V.D. Patil on 8356958500 / 9221233540.

**Sd/-**
**Principal**
**Changu Kana Thakur Arts, Commerce and Science College, New Panvel**

